श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर (महाराष्ट्र)

॥रामकृष्णहरी॥

दिनांक ------/----/२०२३

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जिल्हा - सोलापूर. ४१३३०४.

विषय :- श्री. विठ्ठलाची/श्री रूक्मिणी मातेची/दोन्हीची **चंदनउटी पूजा** करण्याची परवानगी मिळणेबाबत..

अर्जदाराचे पूर्ण नांव :- श्री ------------------------------------------------------------------------------------

संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------- पिन कोड-----------------------------

संपर्क क्रमांक :- ------------------------------ईमेल आयडी------------------------------------------

आधार कार्ड क्र. :- ---------------------------------------- पॅन कार्ड क्र.----------------------------------

महोदय,

विषयांत नमूद केलेप्रमाणे विनंती अर्ज करतो की, मला माझे कुटूंबातील व्यक्तीसह श्री विठ्ठलाची/श्री रूक्मिणी मातेची/दोन्हीची चंदनउटी पूजा करावयाची आहे. त्यासाठी **दिनांक / /२०२३ रोजीची चंदनउटी पूजा करणेची** संधी मला मिळणेस विनंती आहे. त्यासाठीची पुजेची रक्कम श्री विठ्ठलाच्या पूजेची रक्कम रू. २१०००/-, श्री रूक्मिणी मातेची पूजेची रक्कम ९०००/- व दोन्हीकडील पूजा मिळून ३००००/- मी भरण्यास तयार आहे. सदरच्या चंदन उटीपुजेबाबतच्या मंदिर समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना मला मान्य आहेत. त्याचे मी व माझे सोबतच्या व्यक्ती तंतोतंत पालन करू.

१) चंदनउटी पूजेच्या वेळी माझे कुटूंबातील ज्या २ व्यक्तींना (पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले या पैकी २ व्यक्ती ) पूजेसाठी श्री विठ्ठलाच्या/श्री रूक्मिणी मातेच्या गाभा-यात प्रवेश द्यावयाचा आहे, त्यांची नांवे -

| **अ.क्र.** | **पूर्ण नांव** | **वय** | **विवाहीत/ अविवाहीत** | **अर्जदार भाविकाशी नाते** |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

(वरील व्यक्तींच्या फोटो ओळखपत्रांच्या झेरॉक्स प्रती मी सोबत जोडल्या आहेत.)

२) या चंदन उटीपूजेच्या वेळी माझे खाली नमुद केलेले ८ नातेवाईक मंदिरातील चांदीच्या कमानीजवळ बसून पूजा पाहण्यासाठी उपस्थित राहतील. (त्यांना गाभा-यात प्रवेश असणार नाही.)

| **अ.क्र.** | **पूर्ण नांव** | **वय** | **विवाहीत/ अविवाहीत** | **अर्जदार भाविकाशी नाते** |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| | | | | **कृपया मागे पहा...** |

३) चंदन उटीपूजेबाबतच्या सर्व अटी, शर्ती व नियम, सूचना मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना मान्य आहेत. त्यांचे आम्ही तंतोतंत पालन करू. तरी मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना दिनांक / /२०२३ ( वार - ) या तारखेला श्री विठ्ठलाची/श्री रूक्मिणी मातेची चंदनउटी पूजा करण्याची परवानगी मिळावी, ही विनंती.

## चंदन उटीपूजेबाबतच्या अटी, शर्ती व नियम

१. सदरचे पूजेसाठीचे अर्ज दिनांक **३०/०३/२०२३** पर्यंत पोष्टाने/समक्ष स्वीकारण्यात येतील.

२. चैत्र शुध्द २ ते जेष्ठ कृ ३ (**दि. २३/०३/२०२३ ते दि. ०६/०६/२०२३ पर्यंत**) या कालावधीतील शुध्द दशमी, एकादशी, व्दादशी व वद्य एकादशी या दिवशी आणि चैत्र शुध्द ५ ते शुध्द १५ हे दिवस वगळता उर्वरीत दिवसासाठी अर्ज करता येईल. चंदन उटीपूजेची वेळ दुपारी ४.३० ते ५.३० या वेळेत संपन्न होईल.

३. एका दिवशी फक्त **दोनच** कुटुंबांना चंदन उटीपूजा करण्यास परवानगी देण्यात येईल. प्रथम येणा-या अर्जास अगोदर आणि नंतर येणा-या अर्जास नंतर पूजेचा मान देण्यात येईल.

४. चंदन उटीपूजेच्या वेळी समितीच्या उपस्थित पुजा-यांमार्फत ज्या सूचना देण्यात येतील, त्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.

५. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छूक भाविक व त्यासोबतच्या १० व्यक्तींना पुजेचे दिवशी दुपारी ४.०० वा. व्ही.आय.पी गेट येथून प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाचे वेळी इकडील पूजा मंजुरीचे मुळ पत्र व सर्वाची मुळ ओळखपत्र तपासून प्रवेश देण्यात येईल. पूजेला मंदिरात येताना पादत्राणे,कॅमेरा व मोबाईल इ. वस्तू सोबत आणता येणार नाहीत.

६. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छूक भाविकांच्या कुटूंबातील २ व्यक्तींना (पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले व जवळचे नातेवाईक या पैकी २ व्यक्ती) पूजेसाठी श्री. विठ्ठलाच्या गाभा-यात प्रवेश दिला जाईल. अशा व्यक्तींची नावे अर्जात नमुद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्यावेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

७. चंदन उटीपूजेच्या वेळी इच्छुक भाविकांच्या कुटुंबातील वर नमुद व्यक्तीशिवाय, नात्यातील अन्य ८ व्यक्तींना मंदिरातील चांदीच्या कमानी जवळ बसून पूजा पाहता येईल. त्यांना गाभा-यात प्रवेश दिला जाणार नाही, अशा ८ व्यक्तींची नावे अर्जात नमुद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्यावेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

८. श्री. विठ्ठलाचे व रूक्मिणीचे पोशाख झालेनंतर समितीच्या पुजा-या मार्फत चंदन उटी सुरू करण्यात येईल. त्यावेळी वर नमुद दोन व्यक्तींना श्रीं.च्या मुर्तीला चंदन उटी लावण्याचा मान दिला जाईल. त्यावेळी हलक्या हाताने मुर्तीची झीज होणार नाही अशा पध्दतीने चंदन उटी लावणे आवश्यक राहील. उर्वरीत चंदन उटी समितीच्या पुजा-या मार्फत करण्यात येईल. त्यानंतर आपणाकडील १० व्यक्ती मार्फत श्रीं.स तुळशी हार फुले अर्पण करून त्यानंतर श्री. विठ्ठलाचे/श्री. रूक्मिणीचे पदस्पर्श दर्शनाचा लाभ घेता येईल. त्यानंतर समितीमार्फत उपलब्ध होणारा फळे व पेढे व पोहे आणि शि-याचा नैवेद्य आपल्या मार्फत दाखविला जाईल. त्यानंतर आपणास प्रसाद देणेत येईल.

९. चंदन उटीपूजेसाठी येत असलेबाबतचा खात्रीशीर निरोप पूजेच्या आदल्या दिवशी सायंकाळी ६.०० वा. पर्यत नित्योपचार विभागास देणे आवश्यक आहे.

१०. एकदा पूजेचे बुकींग केले नंतर कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही व देणगीची रक्कम परत मागता येणार नाही.

११. अति महत्वाच्या कारणांसाठी आपली पूजा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. त्यावेळी पूजेची पुढील उपलब्ध तारीख आपणांस देण्यात येईल.

१२. आपला अर्ज इकडे प्राप्त होण्यास पोस्टा मार्फत विलंब झालेस. हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१३. अपुर्ण अर्जाचा व ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रति न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची भाविकांनी नोंद घ्यावी.

१४. पूजा झालेनंतर श्रींच्या समोर व श्री रूक्मिणी मातेसमोर फोटो मंदिर समितीच्या छायाचित्रकाराकडून काढण्यात येतील व सदरच्या फोटोची सॉफ्टकॉपी मोफत देण्यात येईल याची भाविकांनी नोंद घ्यावी.

**वरील सर्व नियम, अटी व शर्ती मान्य असलेबाबतची अर्जदाराची स्वाक्षरी.**

**(नाव-------------------------------------------------)**

**नांव व स्वाक्षरी.**

कार्यालय संपर्क क्र. :- 02186 – 223550/224466.
वेबसाईट :- www.vitthalrukminimandir.org
ई मेल आयडी :- eotemple@gmail.com

**-: राम कृष्ण हरी :-**